**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
सुविड फाउंडेशन, रिसोड
वाशिम

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 01-04-2025**

**वॉशिम(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-04-01 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-04-02 | 2025-04-03 | 2025-04-04 | 2025-04-05 | 2025-04-06 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 16.8 | 17.6 | 18.5 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 32.9 | 34.6 | 34.7 | 37.6 | 38.5 |
| किमान तापमान (अं.से) | 25.3 | 25.6 | 25.4 | 26.5 | 27.4 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 89 | 78 | 75 | 67 | 56 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 70 | 55 | 55 | 44 | 38 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 11 | 11 | 11 | 14 | 9 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 90 | 90 | 90 | 320 | 270 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 6 | 6 | 7 | 3 | 2 |
| चेतावणी | आंधी और बिजली, तूफ़ान आदि; तेज़ सतही हवाएँ | आंधी और बिजली, तूफ़ान आदि; तेज़ सतही हवाएँ | आंधी और बिजली, तूफ़ान आदि; तेज़ सतही हवाएँ | कोई चेतावनी नहीं | कोई चेतावनी नहीं |

## भविष्यवाणी सारांश:

• वाशीम जिल्ह्यात भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरच्या जिल्हास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार पुढील ५ पुढील आकाश निरभ्र ते अंशिक ढगाळ राहून दिनांक २ एप्रिल २०२५ रोजी तुरळक हलका पाऊस पडण्याची शक्यता, दिनांक ३ आणी ४ एप्रिल २०२५ रोजी तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता, तसेच दिनांक ५ आणी ६ एप्रिल २०२५ रोजी वातावरण कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. •पुढील ५ दिवसा दरम्यान कमाल तापमान ३२.९ ते ३८.५ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २५.३ ते २७.४ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. •पुढील ३ दिवसात विदर्भात कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सियसने घट होईल, त्यानंतर पुढील काही दिवसात २ ते ३ अंश सेल्सियसने वाढेल.

## हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

•दिनांक ०२ एप्रिल २०२५ रोजी एक ते दोन ठिकाणी वादळी वाऱ्यासह (३०-४० किमी/तास), मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून, दिनांक ०३ आणी ०४ एप्रिल २०२५ रोजी एक ते दोन ठिकाणी वादळी वाऱ्यासह (४०-५० किमी/तास), मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

| |
|---|
| मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट मुळे पशुधन, शेतकरी किंवा शेतमजुरास इजा अथवा मृत्यू होऊ शकतो. वादळी वाऱ्यामुळे झाडांवरील फळांची गळ होऊ शकते, गोठा अथवा शेतात साठवलेला चाऱ्याचे नुकसान होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल पावसाच्या संपर्कात खराब होऊ शकतो. |

## कृषि सल्ला:

| |
|---|
| •मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट मुळे पशुधन, शेतकरी किंवा शेतमजुरास इजा अथवा मृत्यू होऊ शकतो. वादळी वाऱ्यामुळे झाडांवरील फळांची गळ होऊ शकते, गोठा अथवा शेतात साठवलेला चाऱ्याचे नुकसान होऊ शकते. पावसा मुळे परिपक्व अवस्थेतील पिकाचे नुकसान होऊ शकते तसेच प्रत खराब होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल पावसाच्या संपर्कात खराब होऊ शकतो. •पुढील ३ दिवस संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, सध्या हळदीची काढणी,हळद उकळणे,वाळवणे,पॉलिश करणे ही कामे सुरु आहेत. तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असल्यामुळे हळदीची उघड्यावर साठवणूक करू नये. काढणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी. • शेडची व्यवस्था नसल्यास, मोकळ्या जागी ठेवलेला शेतमाल झाकण्यासाठी ताडपत्री किंवा प्लास्टिक शिट ची व्यवस्था करावी. •हंगामी पिके, फळबागा, भाजीपाला पिकामध्ये आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी इत्यादी.), कीड व रोग व्यवस्थापनासाठी कृषी रसायनांची फवारणीची कामे व उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे पुढील ३ दिवसानंतर करावी. •मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतात काम करताना मेघगर्जनेची चाहूल लागताच तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. जिल्ह्यातील मागील घटनांचा संदर्भ लक्षात घेता मेघगर्जनेच्या वेळी पळस,कडूनिंब तसेच ईतर कोणत्याही झाडाखाली आश्रय टाळावा. •वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य फळे तसेच भाजीपाला पिकाची काढणी करून विक्री करावी. फळझाडांना बाबूच्या सहाय्याने आधार द्यावा. •काढणीस तयार असलेल्या मृग बहार संत्रा फळाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. •कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकरी बांधवाद्वारा विक्री साठी आणलेल्या शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतमाल हा उघड्यावर साठवणे टाळावे, शेतमाल हा शेड मध्येच साठवावा. |

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| तीळ | •जमिनीच्या मगदुरा प्रमाणे तीळ पिकाला ओलीत करावे तसेच ओलीत करतांना पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. •उन्हाळी तीळ पिकास आवशकतेनुसार २ ते ३ कोळपण्या/निंदन/खुरपण्या देऊन तिळाचे पिक एक महिण्याचे होईपर्यंत तणमुक्त ठेवावे. •तीळ पिकावरील तुडतुडे आणि पाने गुंडाळणारी अळीच्या व्यवस्थापणासाठी क्वीनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि.ली.प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |
| मुग | •लवकर पेरणी केलेल्या उन्हाळी मुग पिकात आवशकते नुसार २-३ कोळपण्या/खुरपण्या देऊन व निंदन करून शेत स्वच्छ ठेवावे. •लवकर पेरणी केलेल्या उन्हाळी मुग पिकास गरजेनुसार ओलीत करावे. |
| भुई मूग | •उन्हाळी भुईमूग पिकावर रस शोषण करणाऱ्या किडीच्या नियंत्रणाकरीता इमीडाक्लोप्रीड १७.८ टक्के एस.एल.२.५ मिली किंवा क्वीनॉलफॉस २५टक्के इसी १४ मिली यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. •उन्हाळी भुईमूग पिकावरील तांबेरा व टिक्का या रोगाचे व्यवस्थापन करण्यास टेबुकोनोझोल २५ टक्के डब्लू.जी ५००-७५० ग्रॅम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. •वाणापरत्वे शेवटच्या डवरणी वेळी पिकास मातीची भर द्यावी किंवा८ ते९ आठवड्यांच्ये पिक झाले कि पिकावर ड्रम फिरवावा. आऱ्या सुठल्यानंतर आंतरमशागत करू नये. •भुईमुग पिकला आऱ्या तयार होण्याची आवस्था ते शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी. • शक्य असल्यास ओलीत करण्याकरिता तुषार सिंचन पद्धतीचावापर करावा. फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हळद | • पावसाचा अंदाज लक्षात घेता, हळद पिकाची काढणी करून शिजवल्यानंतर (Boiling) उघड्या जागेत वाळवायला न ठेवता शेड मध्ये वाळवावी. • शेडची व्यवस्था नसल्यास, मोकळ्या जागी ठेवलेला शेतमाल झाकण्यासाठी ताडपत्री किंवा प्लास्टिक शिट ची व्यवस्था करावी. |
| टरबूज | • पावसाची ,विजांच्या कडकडाट व वादळी वाऱ्यासह (वेग ४० ते ५० किमी/तास) एक ते दोन ठिकाणी पाऊस होण्याची शक्यता असल्याने परिपक्व झालेली टरबूजाची /खरबूजाची फळे तोडून घेऊन सावलीत ठेवावी व त्यातली किडग्रस्त सडकी फळे वेगळी काढून चांगली फळे बाजारपेठेत नेण्याची व्यवस्था करावी. |
| संत्रा | • बाजारायोग्य फळांची काढणी करून विक्री करावी. •मार्च महिन्यात तापमान वाढ झाल्यामुळे १-४, ५-७, ८ वर्षे आणि त्यावरील वयाच्या झाडांना दररोज अनुक्रमे १२-५३, ७८- १२७ आणि १४५-१८० लिटर पाणी ठिबक सिंचन पद्धतीद्वारे द्यावे. दुहेरी आळे पद्धत अवलंब करावा आणि बगीच्यास ७ ते १० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. झाडांच्या आळ्यांमध्ये आच्छादनाचा वापर करावा. • ब्रशच्या सहाय्याने झाडाच्या खोडावर ६० सेमी उंचीपर्यंत बोर्डो पेस्ट लावावी. •सिट्रस सिला आणि पाने गुंडाळणाऱ्या अळी या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास, डायमेथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली किंवा क्विनालफॉस २ मिली किंवा थायमेथोक्साम ०.३ ग्रॅम प्रती एक लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. १५ दिवसांच्या अंतराने पुन्हा फवारणी करा. •फळातील रस शोषणाऱ्या पतंग या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास, क्विनालफॉस २ मिली किंवा फेनव्हॅलेरेट १ मिली प्रती एक लिटर याप्रमाणात मिसळून पाण्यात फवारणी करावी. १५ दिवसांनी पुन्हा फवारणी करावी. •आंबिया बहरातील फळगळ रोखण्यासाठी २, ४- डी, १.५ ग्रॅम आणि १ किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तापमानात ३५ ते ४० अंश सेल्सिअस वाढ झाल्यास २, ४-डी १.५ ग्रॅम आणि पोटॅशियम नायट्रेट १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |
| भेंडी | •वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य फळे तसेच भाजीपाला पिकाची काढणी करून विक्री करावी. झाडांना बाबूच्या सहाय्याने आधार द्यावा. •सध्याच्या हवामानामुळे भेंडी पिकावरील मावा तुडतुडे व फुलकिडे या रस शोषण करणाऱ्या किडीच्या प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे तरी त्याच्या व्यवस्थापनासाठी थायमीक्थोझाम २५ टक्के विद्राव्य दाणेदार २ ग्राम किंवा इमीडाक्लोप्रीड २ मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |
| टोमॅटो | •वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य फळे तसेच भाजीपाला पिकाची काढणी करून विक्री करावी. झाडांना बाबूच्या सहाय्याने आधार द्यावा. • टोमॅटो पिकामध्ये फुलकिडे आणि पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्याव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | •मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | •रब्बी हंगामातील पिकांच्या कापणी/काढणीनंतर लगेच शेत नांगरून घ्यावे जेणेकरून मातीतील किडींच्या अवस्था व मातीद्वारे होणाऱ्या रोगांचा प्रतिबंध होण्यास मदत होईल. जमिनीची खोल नांगरणी केल्यास जमिनीत पाणी खोलवर जिरते व त्यामुळे जमिनीतील ओल टिकून राहते. |
| सामान्य सल्ला | •हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |

## हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट मुळे पशुधन, शेतकरी किंवा शेतमजुरास इजा अथवा मृत्यू होऊ शकतो. वादळी वाऱ्यामुळे झाडांवरील फळांची गळ होऊ शकते, गोठा अथवा शेतात साठवलेला चाऱ्याचे नुकसान होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल पावसाच्या संपर्कात खराब होऊ शकतो.

## परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

•मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट मुळे पशुधन, शेतकरी किंवा शेतमजुरास इजा अथवा मृत्यू होऊ शकतो. वादळी वाऱ्यामुळे झाडांवरील फळांची गळ होऊ शकते, गोठा अथवा शेतात साठवलेला चाऱ्याचे नुकसान होऊ शकते. पावसा मुळे परिपक्व अवस्थेतील पिकाचे नुकसान होऊ शकते तसेच प्रत खराब होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल पावसाच्या संपर्कात खराब होऊ शकतो. •पुढील ३ दिवस संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, सध्या हळदीची काढणी,हळद उकळणे,वाळवणे,पॉलिश करणे ही कामे सुरु आहेत. तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असल्यामुळे हळदीची उघड्यावर साठवणूक करू नये. काढणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी. • शेडची व्यवस्था नसल्यास, मोकळ्या जागी ठेवलेला शेतमाल झाकण्यासाठी ताडपत्री किंवा प्लास्टिक शिट ची व्यवस्था करावी. •हंगामी पिके, फळबागा, भाजीपाला पिकामध्ये आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी इत्यादी.), कीड व रोग व्यवस्थापनासाठी कृषी रसायनांची फवारणीची कामे व उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे पुढील ३ दिवसानंतर करावी. •म

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**